PRESS RELEASE

# फ्लिपकार्ट होलसेलच्या वतीने फॅशन रिटेलर्सकरिता पहिला-वहिला फेस्टीव्ह सीजन सेल

- 29 सप्टेंबर ते 31 ऑक्टोबर 2020 दरम्यान होणाऱ्या 'बिग फेस्टीव्हल मंथ'मध्ये देशभरातील फॅशन रिटेलर्सना सहभागी होण्याची संधी
- देशी बनावटीची *95%*हून अधिक उत्पादने बी2बी मार्केटप्लेसवर उपलब्ध होणार, स्थानिक एमएसएमई'ना मिळणार चालना
- आगामी काळात फेस्टीव्ह सेलनंतर फ्लिपकार्ट होलसेलचा 15 शहरांमध्ये विस्तार शक्य, स्थानिक एमएसएमई'च्या समृद्धी तसेच वाढीला वेग येणार

**बेंगळूरू – 28 सप्टेंबर, 2020:** फ्लिपकार्ट होलसेल, ही भारताची स्वदेशी बनावटीच्या फ्लिपकार्ट ग्रुपची डिजीटल मार्केटप्लेस असून यंदा ऑगस्ट महिन्यापासून कार्यरत झाली आहे. या मंचावर पहिल्या-वहिल्या फेस्टीव्ह सिजन सेल 'बिग फेस्टीव्ह मंथ'च्या शुभारंभाची घोषणा करण्यात आली. हा सेल 29 सप्टेंबर 2020 दरम्यान सुरू होणार असून 31 ऑक्टोबर 2020 रोजी समाप्त होईल. फॅशन वर्गवारीतील 50 हून अधिक ब्रँड, 100+ विक्रेते आणि 1 लाख सदस्य त्यांचे ब्रँड सादर करणार आहेत.

लॉन्चपासून फ्लिपकार्ट होलसेलचा विस्तार 15 शहरांमध्ये झाला असून आता देशातील 750+ नवीन पिन कोडवर सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. फ्लिपकार्टच्या बळकट स्वदेशी क्षमता, ग्राहकांच्या विस्तृत ई-कॉमर्स सेगमेंटमधील नेतृत्वासह भारतीय उद्योगाची अनोखी जाण यांच्यासह हा ब्रँड सज्ज झाला आहे. फ्लिपकार्ट होलसेलमुळे किराणा आणि एमएसएमईसाठी व्यवसाय सुलभ झाला असून तो भारताच्या रिटेल इकोसिस्टीमचा अविभाज्य भाग आहे.

**फ्लिपकार्ट होलसेल अँड वॉलमार्ट इंडियाचे सिनिअर व्हाईस प्रेसिडेंट अँडहेड, आदर्श मेनन** म्हणाले की**,** आगामी फेस्टीव्ह सिजन हा विक्रेते आणि एमएसएमईंच्या विक्री तसेच नफ्याला चालना देणारी सर्वोत्तम संधी आहे. आमच्या भागीदारांसाठी उत्सवी आनंद देण्याचा आमचा प्रयत्न आहे, त्यांच्यासाठी व्यवसाय सुलभ करायचा असून समर्पक द्रष्टेपण आणि स्टॉक सिलेक्शनमार्फत मागणीनुरूप पुरवठा करायचा आहे. संपूर्ण रिटेल इकोसिस्टीमला एकत्रित करण्याच्या अनुषंगाने आम्ही ही संधी घेत आहोत. जेणेकरून ग्राहकांच्या जाणीवा वृद्धिंगत होतील. देशातील स्थानिक एमएसएमईंकरिता व्यवसायाला चालना मिळेल.*"*

फ्लिपकार्ट होलसेल'चा 'बिग फेस्टीव्हल मंथ' हा भारतीय उत्सवाचा जल्लोष साजरा करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. या माध्यमातून मेन्स वेअर, विमेन वेस्टर्न वेअर, विमेन एथनिक वेअर, किड्स वेअर आणि फुटवेअरच्या विस्तृत उत्पादन श्रेणींच्या व्यापक ऑफर उपलब्ध असतील. फ्लिपकार्ट होलसेलचे कार्यशील

तंत्रज्ञान आणि लॉजीस्टीक यांच्यामुळे मोठ्या प्रमाणात उत्पादनांची खरेदी शक्य आहे. या माध्यमातून सर्वोत्तम मार्जिन, सुलभ क्रेडीट, घरपोच सेवा, खात्रीशीर दर्जा, स्मार्ट निवड आणि सुलभ परताव्याची हमी राहील.

या मंचावर विक्रेत्यांना बळकट तंत्रज्ञानाची जोड मिळाल्याने ऑर्डर नोंदणी गुंतागुंत-मुक्त झाली असून प्रक्रिया सहज बनली.

आता फ्लिपकार्ट होलसेल ॲप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे. फ्लिपकार्ट होलसेलविषयीची अधिक माहिती https://flipkartwholesale.com/ वर पाहता येईल.

**फ्लिपकार्ट ग्रुपबद्दल**

फ्लिपकार्ट ग्रुप हा भारतातील एक आघाडीचा डिजिटल कॉमर्स उद्योगसमूह आहे आणि त्यात फ्लिपकार्ट, मिंत्रा आणि फोनपे या ग्रुप कंपन्यांचा समावेश आहे. फ्लिपकार्टची स्थापना 2007 साली झाली. फ्लिपकार्टने लाखो ग्राहक, विक्रेते, व्यापारी आणि लघु उद्योगांना भारताच्या ई-कॉमर्स क्रांतींचा एक भाग होण्यासाठी सक्षम केले. त्यांचे 25 कोटींहून अधिक नोंदणीकृत ग्राहक आहे, त्यांच्यातर्फे 80+ विभागांमध्ये 15 कोटींहून अधिक उत्पादने उपलब्ध करून देण्यात येतात. भारतात ई-कॉमर्सचे लोकशाहीकरण होण्यासाठी आमचे प्रयत्न, उत्पादनांची उपलब्धता आणि वाजवी किंमतीत उत्पादने उपलब्ध करून देणे, ग्राहकांना समाधान देणे, या अर्थचक्रामध्ये लाखो रोजगारांची निर्मिती करणे आणि उद्योजकांच्या व एमएसएमईंच्या अनेक पिढ्या घडविणे यामुळे या क्षेत्रातील अनेक गोष्टींचे उद्गाते होण्यास आम्हाला प्रेरणा मिळाली. फ्लिपकार्ट होलसेल या आमच्या नव्या डिजिटल मार्केटप्लेसचा लॉंच हा भारतातील किराणा व एमएसएमईंच्या वाढीचा वेग वाढविण्यासाठी असलेल्या आमच्या निष्ठेचा द्योतक आहे. कॅश ऑन डिलिव्हरी, नो कॉस्ट ईएमआय आणि सुलभ रिटर्न्स या ग्राहककेंद्री अभिनव उपक्रमांची सुरुवात फ्लिपकार्टने केली. त्यामुळे लाखो भारतीयांसाठी ऑनलाइन खरेदी अधिक व्यवहार्य आणि परवडण्याजोगी झाली. ऑनलाइन फॅशन मार्केटमध्ये भक्कम स्थान निर्माण केलेली मिंत्रा, भारतातील सर्वात वेगाने वाढणारा डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्म असलेला फोनपे आणि आता फ्लिपकार्ट होलसेल, फ्लिपकार्ट ग्रुप तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भारतातील व्यवसायक्षेत्राचे परिवर्तन घडविण्याचे कार्य सुरूच ठेवणार आहे.

अधिक माहितीकरिता कृपया लिहा
media@flipkart.com